SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 6 7 8 दि. 15 OCT 2025

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
कोल्हापूर जिल्हयातील सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- आगामी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करण्यासाठी शैक्षणिक संस्थाची बैठक आयोजित करण्याबाबत.

संदर्भ :- १) जिल्हाअधिकारी कार्यालय, कोल्हापूर (निवडणूक शाखा) स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र. क्र.कार्या-१०/निवडणूक/म.नों./आरआर-३०१/२०२५, दि. १३/१०/२०२५ रोजीचे पत्र
२) विभागीय आयुक्त कार्यालय, (सामान्य प्रशासन विभाग) विधान भवन, पुणे यांचे जा.क्र. क्र.सा.प्र.४/निवडणूक/कावि-७७३/२०२५, दि.१०/१०/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते कि, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, यांच्याकडील दि.१३/१०/२०२५ रोजीच्या प्राप्त पत्रानुसार पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूकीच्या मतदार याद्या नव्याने तयार करणेबाबत कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने व आगामी शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयातील जास्तीत जास्त पात्र मतदारांची नोंदणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. मतदार नोंदणी अधिकारी पदवीधर व शिक्षक मतदार संघ तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांनी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयाचे/शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य यांची ऑनलाईन बैठक जिल्हाधिकारी कार्यालय नागाळा पार्क कोल्हापूर येथील नवीन हॉल मध्ये दि.१६/१०/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता बैठक अयोजीत केली आहे. तरी सदर बैठकीसाठी सर्व संबधितानी सकाळी १०.१५ वा हॉल मध्ये उपस्थित राहवे ही विनंती. सोबत संदर्भिय पत्राची प्रत्र जोडली आहे.

कळावे.

आदेशान्वये
RSPande
उपकुलसचिव

सोबत :- वरील संदर्भीय पत्र

E:\Nil\Parit Sir\Circular 2025.docx

जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
(निवडणूक शाखा)
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - 416 003
ई-मेल - dydeokolhapur@gmail.com दूरध्वनी- 0231-2658316

क्र.कार्या-१०/निवडणूक/म.नों./आरआर- ३०१/२०२५ दिनांक : १३ ऑक्टोबर २०२५

प्रति,

१) मा.कुलसचिव, शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर
२) मा.कुल सचिव, कृषी विदयापीठ, कोल्हापूर
३) मा.विभागीय उपसंचालक (शिक्षण) हत्ती महाल, मटण मार्केटच्या जवळ, कोल्हापूर
४) मा.सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर
५) मा. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय:- आगामी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी नव्याने मतदार याद्या तयार करणेसाठी शैक्षणीक संस्थांची बैठक आयोजीत करणेबाबत.**

**संदर्भ:-** मा.मतदार नोंदणी अधिकारी, पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. साप्र-४/निवडणूक/कावि/७७३ /२०२५ दिनांक १०/१०/२०२५

महोदय

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्र. ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६ दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूकीच्या मतदार यादया नव्याने तयार करणेबाबत कार्यक्रम घोषित केलेला करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३०/०९/२०२५ रोजी मतदार नोंदणी नियम १९६० चे कलम ३१(३) व ३१(४) अन्वये जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने व आगामी शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीचे अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयातील जास्तीत जास्त पात्र मतदारांची नोंदणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी मा.मतदार नोंदणी अधिकारी, पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांनी जिल्हा मुख्यालयातील विदयापीठाचे कुलसचिव, सर्व सबंधित विभागाचे अधिकारी, शैक्षणीक संस्थांचे प्राचार्य / मुख्याध्यापक यांची ऑनलाईन बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर नागाळा पार्क नविन हॉल येथे दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत केलेली आहे. तरी बैठकीसाठी सर्व सबंधितांनी **सकाळी ठिक १०.१५ हॉलमध्ये** उपस्थित रहावे. तसेच जिल्हा मुख्यालयातील आपले अधिपत्याखालील शैक्षणीक संस्थांचे प्राचार्य / मुख्याध्यापक यांना आपले स्तरावरुन सदर बैठकीसाठी उपस्थित राहणेसाठी लेखी सुचित करावे ही विनंती. सोबत संदर्भिय पत्राची प्रत जोडली आहे.

आपला विश्वासू

(सुनिल शेरखाने)
तहसिलदार (निवडणूक)
जिल्हा निवडणूक कार्यालय,
कोल्हापूर

प्रत:- मा.मतदार नोंदणी अधिकारी, पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहीतीसाठी सविनय सादर.

विभागीय आयुक्त कार्यालय
(सामान्य प्रशासन विभाग) विधान भवन, पुणे-०१

ई मेल- gb.divcompune@gmail.com दुरध्वनी क्र. ०२०-२६३६१०६८

क्र.सा.प्र.४/निवडणूक/कावि-/२०२५ दिनांक- १०.१०.२०२५

निवडणूक तात्काळ

प्रति,

सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी पुणे / सोलापूर / सातारा / सांगली / कोल्हापूर

विषय : पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करणेसाठी शैक्षणिक संस्थांची बैठक आयोजीत करणे बाबत.

संदर्भ : मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र. ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६ दिनांक १२ सप्टेंबर, २०२५.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्र. ०१ अन्वये भारत निवडणूक आयोगाने दिनांक ०१.११.२०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषीत केला आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३०.०९.२०२५ रोजी मतदार नोंदणी नियम १९६० चे कलम ३१(३) व ३१(४) अन्वये जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

पुणे विभागातील सर्व पदवीधर व शिक्षक मतदारांची नोंदणी होणेचे अनुषंगाने, विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विभाग, पुणे येथे विभागातील सर्व संबंधीत शासकीय अधिकारी / शिक्षण संस्था / वैद्यकीय, विधी, अभियंता, बँका व इतर व्यावसायीक नोंदणीकृत संस्था/ संघटना यांची बैठक दिनांक १६.१०.२०२५ रोजी ११.०० वाजता आयोजीत करण्यात आली असुन त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. सदर बैठकीसाठी सोबत जोडलेल्या यादीनुसार सर्व विभागस्तरीय अधिकारी यांनी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे त्यांचे कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्था / महाविद्यालय / माध्यमिक शाळा इ.मधील पात्र शिक्षक व पदविधर मतदारांच्या यादीसहीत समक्ष उपस्थित रहाणेचे आहे.

२. सदर बैठकीसाठी जिल्हा मुख्यालयातील अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात समक्ष उपस्थित राहणेचे असून जिल्हाधिकारी यांनी जिल्हा मुख्यालयातील विद्यापीठांचे कुलसचिव, सर्व संबंधीत विभागाचे अधिकारी, शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य / मुख्याध्यापक यांना त्यांचे कार्यालयात बैठकीसाठी समक्ष बोलविण्याचे असून व्ही. सी. व्दारे बैठकीसाठी संपूर्ण व्यवस्था, हजेरी, इतिवृत्त, इ. बाबत कार्यवाही करावयाची आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांना बैठकीची ऑनलाईन लिंक उपलब्ध करून देण्यात येईल.

३. ग्रामीण भागातील उपविभाग / तालुका स्तरावरील संबंधित विभागाचे अधिकारी/ शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी तालुका मुख्यालय स्तरावर सदर बैठकीस ऑनलाईन पद्धतीने उपस्थित रहावयाचे असून पुरेशा लोकांसाठी व्ही. सी. व्दारे उपस्थित राहणेकामी बैठकीची व्यवस्था संबंधित तहसिलदार / उपविभागीय अधिकारी यांनी करणेचे आहे.

४. बैठकीसाठी निमंत्रित यांनी बैठकीच्या ठिकाणी दिनांक १६.१०.२०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता न चुकता उपस्थित राहणेचे असून बैठक सुरु होणेपुर्वीच जिल्हा व तालुकास्तरीय बैठकीच्या हजेरीचा अहवाल सर्व जिल्ह्यांच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी विभागीय आयुक्त कार्यालयास देणेचा आहे. तसेच बैठकीनंतर उपस्थितांच्या हजेरीच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

सदरची बैठक ही पदवीधर व शिक्षक मतदारसंघाची नव्याने मतदार यादी तयार करणेसाठी मतदार नोंदणी करणेबाबतची महत्वाची बैठक असून सदर बैठकीस अनुपस्थित राहिल्यास निवडणूक /मतदार नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीतांविरुध्द कारवाई करणेत येईल याची सर्व संबंधीतांना समज देणेत यावी.

10.10.25

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
मतदार नोंदणी अधिकारी
पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ, तथा
विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे